दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com

संपादक : अजय भांगे

https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | गुरुवार दि.५ मार्च २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक १८८ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Thrusday 5 March 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 188 | Pages 4 | Rate 4 Rs


### हरकत असेल तर तक्रार करा,पण बाप काढणे योग्य नाही

**मुंबई**–मुंबईत सुरू असलेल्या महाराष्ट्र विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात राजकीय वातावरण आधीच तापलेले असताना मंगळवारी आणखी एक नवा वाद समोर आला. आमदार सचिन कल्यणाशेट्टी आणि आमदार भास्कर जाधव यांच्यात विधिमंडळ परिसरातच जोरदार शाब्दिक चकमक झाली. विधानसभा इमारतीच्या पोर्चमध्ये दोन्ही आमदार आमनेसामने आल्याने काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. तुम्ही बाप का काढला? या प्रश्नावरून हा वाद चांगलाच रंगला. उपस्थित आमदार, कर्मचारी आणि कार्यकर्त्यांसमोर झालेल्या या बाचाबाचीमुळे अधिवेशनाच्या चर्चांना वेगळे वळण मिळाले.सध्या सुरू असलेले बजेट सेशन विविध मुद्द्यांमुळे वादग्रस्त ठरत आहे. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातासंदर्भातील संशय, तसेच इतर राजकीय घडामोडींमुळे सभागृहात आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. त्यातच हा नवा वाद उफाळून आला. माहितीप्रमाणे, विधानसभा आमदार राहुल आवाडे यांची मुलगी सानिका आणि राजेंद्र पाटील यड्रावकर यांचे चिरंजीव अजय यांच्या विवाहसोहळ्याची पत्रिका आमदारांच्या खासगी सहाय्यकांकडून विधिमंडळ परिसरात वाटली जात होती. एकाच ठिकाणी सर्व सदस्य उपस्थित असल्याने सोयीसाठी हे वाटप सुरू होते.

# उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली विधानभवनात महिला सुरक्षिततेवर उच्चस्तरीय बैठक

## सेफ्टी ऑडिट अहवालाचा आढावा; पॅनिक बटण व्हॉट्सअॅपशी जोडण्याचे व स्कूल बस शाळेच्या आवारातच उभ्या करण्याचे दिले निर्देश

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत महिलांच्या सुरक्षिततेसंदर्भात करण्यात आलेल्या राज्यव्यापी सेफ्टी ऑडिटचा आढावा घेण्यासाठी विधानभवनात उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय बैठक पार पडली. बदलापूर येथील अल्पवयीन मुलीवरील अत्याचाराची घटना आणि स्वारगेट बसस्थानकावरील प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर ही बैठक आयोजित करण्यात आली. स्वयंसेवी संस्थांमार्फत राज्यातील २४२ ठिकाणी करण्यात आलेल्या सेफ्टी ऑडिटमधील शिफारशी तातडीने आणि निश्चित कालमर्यादेत अंमलात आणाव्यात, असे स्पष्ट निर्देश डॉ. गोऱ्हे यांनी प्रशासनाला दिले. अहवालात बसस्थानके, रेल्वे स्थानके व सार्वजनिक वाहतुकीशी संबंधित ठिकाणांची प्रत्यक्ष पाहणी करून सीसीटीव्ही, प्रकाशव्यवस्था, महिला पोलिसांची गस्त, हेल्पलाईन, पॅनिक बटण, स्वच्छतागृहे, तक्रार नोंदणी प्रणाली आणि 'हिरकणी कक्ष' यांची स्थिती तपासण्यात आली. अनेक सुविधा अस्तित्वात असूनही त्यांची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचे निदर्शनास आले. विशेषतः पॅनिक बटण प्रणाली कार्यक्षम नसल्याचे आढळल्याने ती नियंत्रण कक्षाशी तसेच व्हॉट्सअॅप क्रमांकाशी थेट जोडण्याचे निर्देश देण्यात आले, जेणेकरून आपत्कालीन परिस्थितीत महिलांना त्वरित मदत मिळेल.डॉ. गोऱ्हे यांनी प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर भर देत शालेय बस चालक व कर्मचाऱ्यांना विशेष प्रशिक्षण देणे, बसस्थानकांवर सीसीटीव्ही संदर्भातील स्पष्ट फलक लावणे, पॅनिक बटणाविषयी जनजागृती वाढवणे आणि शाळांनी बस शाळेच्या आवारातच उभ्या करण्याची व्यवस्था करणे आवश्यक असल्याचे सांगितले. पीडित मुलींना शासकीय योजनांचा लाभ मिळतोय का याची पडताळणी करून आवश्यकतेनुसार समुपदेशनाची



सुविधा उपलब्ध करून द्यावी, असेही त्यांनी नमूद केले.असंघटित क्षेत्रातील महिला कामगारांच्या सुरक्षेसाठी स्वतंत्र उपाययोजना आखून त्यांच्या नोंदीसाठी विशेष प विकसित करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. तसेच वन स्टॉप क्रायसिस सेंटरचा नियमित आढावा घेऊन प्रत्यक्ष लाभार्थींना मदत मिळते का याचे मूल्यमापन करण्याच्या सूचना देण्यात आल्या.परिवहन विभागाने ६३३ ठिकाणी सीसीटीव्ही बसविल्याची माहिती दिली असून प्रत्येक बसस्थानकावर सुरक्षा रक्षकांची नेमणूक करण्यात आल्याचे सांगितले. शालेय बसमध्ये महिला सहाय्यक नेमणे बंधनकारक करण्यात आले असून लवकरच सर्व बसमध्ये सीसीटीव्ही, जीपीएस आणि पॅनिक बटण प्रणाली अनिवार्य करून ती पोलीस विभागाशी जोडण्यात येणार आहे. पोलीस विभागाने शाळा सुटण्याच्या वेळेत गस्त वाढवली असून प्रत्येक पोलीस चौकीत 'भरोसा सेल' कार्यरत असल्याचे स्पष्ट केले.बैठकीस अपर पोलीस महासंचालक अश्वती दोर्जे, परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर, उपसचिव (शालेय शिक्षण) तुषार महाजन, कामगार कल्याण आयुक्त भास्कर मोराडे, उपायुक्त (महिला व बाल कल्याण) राहुल मोरे तसेच एस.टी. महामंडळाचे सुरक्षा व दक्षता अधिकारी श्री. तिकोटकर , शारदा साठे ,स्त्री मुक्ती परिषद आदी उपस्थित होते.स्त्री मुक्ती परिषद व स्त्री आधार केंद्राने सेफ्टी ऑडिट म्हणजेच महिला सुरक्षेचा लेखाजोखा यांवर १० फेब्रुवारी २६ रोजी शिष्टमंडळ भेटुन कार्यवाहीची विनंती केली होती . बैठकीच्या शेवटी प्रत्येक बसस्थानकावर महिला कर्मचाऱ्यांची नेमणूक करून स्वतंत्र मदत केंद्र सुरू करण्याचे, रेल्वे व एसटीसाठी स्वतंत्र दक्षता समित्या स्थापन करण्याचे आणि स्वच्छतागृह व 'हिरकणी कक्ष' यांची नियमित तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आले. उपसभापती कार्यालयामार्फत स्वतंत्र महिला सुरक्षा समिती स्थापन करून सेफ्टी ऑडिटमधील सर्व शिफारशींची टप्प्याटप्प्याने काटेकोर अंमलबजावणी केली जाईल, असे डॉ. गोऱ्हे यांनी स्पष्ट केले.

# २१ शुगर लिमिटेड, शिवणी (जा) साखर कारखाना ने मोजक्याच गावांना उसाचे बिल दिल्याने शेतकरी तीव्र नाराज

दैनिक वादळ वार्ता

**लोहा । प्रतिनिधी**

लोहा तालुक्यातील २१ शुगर लिमिटेड शिवणी साखर कारखाना हा नेहमीच चर्चेचा विषय ठरत आहे कधी शेतकऱ्यांनी विनंती करून वेळेवर ऊस खरेदी करायचा नाही तर कधी बिल वेळेवर द्यायचे नाही...

लोहा तालुक्यातील जामगा शिवणी येथील २१ शुगर लिमिटेड साखर कारखाना सुरू झाला शेतकऱ्यांना एक दिलासा मिळाला की आपल्या परिसरात साखर कारखाना उभारला आणि आता आपल्या ऊसाला चांगला हमी भाव मिळणार आपला ऊस वेळेवर कारखान्यात जाणार आपल्या परिसरातील शेतकऱ्याचे उत्पन्न वाढणार मुलां बाळांचे चांगले शिक्षण होणार चांगला रोजगार उपलब्ध होणार पण असे झाले नाही नेहमीच या साखर कारखाना परिसरातील शेतकऱ्याचे मोठे नुकसान होताना पाहायला मिळत आहे. तसेच या

**२१ शुगर लिमिटेड साखर कारखाना शिवणी ता. लोहा यांनी ऊसाचे बिल लवकरात लवकर थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावी अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल..**

**–शेतकरी पुत्र सतीश पाटील गवते पेनुर**



फेब्रुवारी २०२६ महिना अखेर परिसरातील सर्व शेतकरी बांधवांचे उसाचे बिल प्रलंबित असलेले त्यांच्या थेट खात्यात जमा होणार होते असे कारखाना पदाधिकाऱ्यांकडून माहिती देण्यात आली होती पण अगदी मोजक्याच गावांना व त्यातील काही मोजक्याच शेतकऱ्यांना या उसाचे बिल मिळाल्यामुळे बाकी ग्रामीण भागातील शेतकरी तीव्र नाराज झाला असून आपण असे मोजक्याच गावांना कसे बिल देऊ शकता असा सवाल कारखान्याला विचारला जात आहे. नवीन ऊस लावणी मुलाबाळांचे शिक्षण लग्न विवाह यासारख्या अनेक गोष्टींना शेतकऱ्यांना सामोरे जावे लागते अशा परिस्थितीत कारखान्याने बिल प्रलंबित ठेवल्यामुळे शेतकऱ्यांच्या आशा कागदोपत्रीच राहिल्या आहेत.. परिसरातील शेतकरी वर्ग हा आपल्या भागात साखर कारखाना चालू झाल्यामुळे आपल्या शेतात ऊस पिकवण्यावर भर देत आहेत पण सदरील साखर कारखाना वेळेवर बिल देत नसल्यामुळे आता शेतकऱ्यांनी काय करावे असा प्रश्न निर्माण झाला आहे आपण पुढच्या वर्षी ऊस लावावा की नाही असा त्यांना कुठेतरी प्रश्न पडला आहे सदरील भागातील काही शेतकरी यांचे वेगवेगळे उत्पनाचे साधन असल्यामुळे त्यांना या बिल न पडल्याचा फारसा फरक पडत नाही पण निव्वळ शेतीवर अवलंबून असणाऱ्या शेतकऱ्यांना मात्र या प्रलंबित बिल ठेवल्यामुळे चांगलाच फटका बसत आहे त्यामुळे सर्व सामान्य शेतकऱ्यातून पुन्हा पुन्हा कारखान्यास विनंती करण्यात येत आहे की आपण राहिलेल्या शेतकऱ्यांची बिले अगदी कमी कालावधीत देऊन सहकार्य करावे अन्यथा आम्हाला वेगळा मार्ग अवलंबन करावा लागेल.

## तुलसी समूहाची महिला मॅरेथॉन आता 'सामाजिक न्याय भवन' येथून; रमजान ईदमुळे प्रारंभ स्थळात बदल

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून 'तुलसी शैक्षणिक समूह, बीड' यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही रविवार, दि. ८ मार्च रोजी भव्य 'महिला मॅरेथॉन' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. यावर्षी रमजान ईदमुळे वाहतूक आणि नियोजनाच्या सोयीसाठी स्पर्धेच्या प्रारंभ स्थळात बदल करण्यात आला असून, आता ही स्पर्धा डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, बीड येथून सुरू होणार आहे.आयोजकांनी दिलेल्या माहितीनुसार, रविवारी सकाळी ठीक ६:०० वाजता मान्यवरांच्या हस्ते या मॅरेथॉनला हिरवा झेंडा दाखवण्यात येईल. ७ किलोमीटर अंतराची ही स्पर्धा सामाजिक न्याय भवन येथून प्रारंभ होऊन नगर रोडमार्गे पुन्हा त्याच ठिकाणी समारोप होईल. पूर्वीचे छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण हे स्थळ बदलून आता 'सामाजिक न्याय भवन' निश्चित करण्यात आले आहे, याची सर्व स्पर्धकांनी नोंद घ्यावी.स्पर्धा दोन वयोगटांत विभागण्यात आली आहे. १० ते १८ वर्षे वयोगट आणि १८ वर्षांवरील महिलांसाठी स्वतंत्र गट ठेवण्यात आले आहेत. प्रत्येक गटातील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक विजेत्यांना अनुक्रमे १५,०००, १०,००० व ७,००० अशी रोख पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.सर्व सहभागी स्पर्धकांना आकर्षक टी-शर्ट, नाश्ता व सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. लहान गटासाठी ५० तर मोठ्या गटासाठी २०० असे नोंदणी शुल्क निश्चित करण्यात आले आहे.या भव्य स्पर्धेत सहभागी होण्यासाठी इच्छुक महिला व विद्यार्थिनींनी शुक्रवार, दि. ६ मार्चपर्यंत आपली नोंदणी पूर्ण करणे बंधनकारक आहे. अधिक माहिती आणि नावनोंदणीसाठी ८७८८५३७३४४ किंवा ८२७५५४२०८२ या क्रमांकावर संपर्क साधावा. महिला शक्तीचा जागर करणाऱ्या या उपक्रमात स्पर्धकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन तुलसी शैक्षणिक समूहाच्या वतीने करण्यात आले आहे.

## आई वडीलांच्या वचनाचे पालन केल्यास आपण केलेला निश्चय पूर्ण होतो–ह.भ.प.इंदुवासीनी महाराज

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील देवगांव येथील माजी पोलीस पाटील कै. बाबुराव माधवराव मुंडे यांची २७ वी तर कै. लक्ष्मीबाई बाबुराव मुंडे (पाटील) यांच्या ९ व्या पुण्यतिथी कार्यक्रमा प्रसंगी बोलताना ह.भ.प. त्रिविक्रमानंद शास्त्री इंदुवासिनी (पिंपळनेरकर) महाराज म्हणाले की,कै.लक्ष्मीबाई बाबुराव मुंडे यांची तीनही मुले व दोन मुली खुप भाग्यवान आहेत.त्यांनी जिवंतपणी ही आई वडीलांची सेवा करुन पून्हा त्यांच्या पश्चातही गेल्या २७ वर्षापासुन आपल्या आई वडीलांची पुण्यतीथी करुन मानवता जागृत वचनाचे पालन करत आहेत.त्यामुळे त्यांनी केलेला निश्चय हा पूर्ण होतो असे महाराज यावेळी म्हणाले.या कार्यक्रमासाठी उपस्थित असलेल्या सर्व महाराज मंडळीनी कै.आण्णा व आक्का यांना विनम्र अभिवादन करुन विक्रमबप्पा मुंडे, शशिकांत नाना मुंडे, रमाकांत बापू मुंडे व दोन मुलींना आशिर्वाद दिले. केज तालुक्यातील देवगांव येथील माजी पोलीस पाटील कै. बाबुराव माधवराव मुंडे यांची २७ वी तर कै. लक्ष्मीबाई बाबुराव मुंडे (पाटील) यांच्या ९ व्या पुण्यतिथीचा कार्यक्रम दि.२मार्च सोमवार रोजी आयोजित केला होता. यावेळी ह.भ.प. त्रिविक्रमानंद शास्त्री इंदुवासिनी पिंपळनेरकर यांचे सुश्राव्य असे कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते.या ठिकाणी विक्रमबप्पा मुंडे शशिकांत नाना मुंडे, रमाकांत बापू मुंडे यांनी कै.आण्णा आक्कांच्या प्रतिमेचे पुजन केले. यावेळी ह.भ.प.रतन महाराज सासुरेकर, ह.भ.प.श्रीराम महाराज विडेकर, ह.भ.प.भगवान महाराज वरपगांवकर, ह.भ.प.पुरुषोत्तम महाराज शास्त्री आंधळेवाडी,ह.भ.प. तुकाराम महाराजआंधळे आंधळेवाडी,ह.भ.प. ज्ञानोबा माऊली महाराज आ.बरड,ह.भ.प. नारायण महाराज उत्रेश्वर पिंप्री,ह.भ.प.केशव महाराज शास्त्री टाकळी, ह.भ.प.लक्ष्मण महाराज इनामदार येवता,ह.भ.प. तुकाराम महाराज लाड बरड या महाराज मंडळींनी कै.बाबुराव (आण्णा) मुंडे व कै.लक्ष्मीआक्का विनम्र अभिवादन करुन त्यांच्या तिन्ही मुला मुलींना आशिर्वाद दिले.या कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या सर्व महाराज मंडळींचा व भजनी मडंळी व आलेले पाहुणे मंडळी राजेश कराड, केंद्रे,रमेशराव आडसकर, महादेव आप्पा चौरे, अंकुशराव इंगळे,संतोष हांगे,त्रिंबकराव हांगे,दत्ता धस,बप्पासाहेब घुगे, सुनिल गलांडे सह अनेक मान्यवरांचा सत्कार शशिकांत नाना मुंडे, विजयकांत मुंडे,रमाकांत बापू मुंडे,भास्कर मुंडे व अतुल मुंडे,अमित मुंडे, मधुर मुंडे यांनी केला. यावेळी केजच्या माजी आ.सौ.संगीताताई ठोंबरे यांचा सत्कार सौ. उषाताई मुंडे यांनी केला. या कार्यक्रमासाठी केज तालुक्यातील व विडा जि.प.सर्कल मधील अनेक गावातील नागरीक मोठ्या संख्येंने उपस्थित होते.या कार्यक्रमाला आलेल्या सर्व पाहुण्यांचे व ग्रामस्थांचे आभार ह.भ.प.केशव शास्त्री महाराज घुले टाकळीकर यांनी मुंडे परिवाराच्या वतीने मानले.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विजयकांत मुंडे,अमित मुंडे,अतुल मुंडे,मधुर मुंडे, यांनी परिश्रम घेतले. महाप्रसादाच्या पंगतीने या कार्यक्रमाची सांगता झाली.



# शिरपूरकडून गुजरातला जाणारा दारू चा ट्रक नंदुरबार पोलिसांच्या जाळ्यात

## ७ लाख ४० हजरांचा मुद्देमाल जप्त

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**


नंदुरबार तालुका पोलिसांनी कोरीट फाट्यावर मोठी कारवाई करत अवैध दारूची चोरटी वाहतूक करणारा अशोक लेलँड ट्रक पकडला आहे. या कारवाईत पोलिसांनी एकूण ७ लाख ४० हजार ८४८ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, दोन आरोपींना ताब्यात घेतले आहे. गुप्त बातमीदाराकडून मिळाली त्यानुसार नंदुरबार तालुका पोलीस ठाण्याचे प्रभारी दिनेश भदाणे यांना १ मार्च २०२६ रोजी गुप्त माहिती मिळाली होती की, शिरपूरकडून कोरीटमार्गे एक वाहन विनापरवाना दारू घेऊन गुजरातच्या दिशेने जात आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवण दत्त. एस यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी तात्काळ कोरीट फाटा येथे सापळा रचला. संशयास्पद वाहन (क्रमांक GJ 26 U 0108) नाक्याकडे येताना दिसताच



पोलिसांनी त्याला थांबवले. सुरुवातीला वाहनातील इसमांनी पोलिसांच्या प्रश्नांना उडवाउडवीची उत्तरे दिली. मात्र, संशय बळावल्याने पोलिसांनी वाहनाची कसून तपासणी केली असता, त्यामध्ये देशी व विदेशी दारूचा मोठा साठा मिळून आला. या प्रकरणी पोलिसांनीदोघांना अटक केली आहे: त्यामध्ये फैजल मोहम्मदभाई हारथी (वय ४६, राहणार भावनगर, गुजरात) तसेच जयेश राजेंद्र पाटील (वय २६, राहणार जुने भामपूर, तालुका शिरपूर) या दोघांविरुद्ध तालुका पोलीस ठाण्यात महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (ई) व १०८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही यशस्वी कामगिरी पोलीस अधीक्षक श्रवण दत्तएस, अपर पोलीस अधीक्षक आशित कांबळे, आणि उपविभागीय पोलीस अधिकारी संजय महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. पथकात प्रभारी अधिकारी दिनेश भदाणे, पोलीस उपनिरीक्षक सुनील भामरे, सुनील सोनवणे, राजेंद्र धनगर, महेंद्र सोनवणे आणि सचिन सैंदाणे यांचा समावेश होता.

# चळवळ,निळ्या झेंड्याची.!

अभेद्य अशी आक्रमक निळ्या झेंड्याची आंबेडकरी चळवळ,
आता थंडाऊन,निपचित पडलीय,
हे पाहून इंगळ्या डसल्यागत
मन सुन्न होतय,
कानांना बहिरेपणा येतोय,
कारण ती विखुरली गेलीय,
अनेक गटा, तटात.!
हे जरी खरं असले तरी,
प्रसंगानुसार आंबेडकरी अनुयायी,
बिगर नेता,
गट, तट विसरुन , एकोप्याने ,
जीवाची बाजी लावून,
संघर्षांस उभे ठाकतात,
एकजीव होऊनी, वैर्याला.भिडतात,
अन्याय , अत्याचार्यांशी,
नेभळट जातीयवाद्यांशी,
पुतळा विटंबना करणार्यांशी,
माय भगिनींवर अन्याय, अत्याचार
करणार्यांशी,
अन बाबांची बदनामी करणाऱ्यांशी.!
ह्या परिस्थितीला कारण काय ?
सरकारला बेडरपणे जाब विचारणारा ताफा,
अन अन्यायाविरोधात धडाडणार्या तोफा,
काळाच्या पडद्याआड गेल्यात,
बंदुका सत्तेच्या उबदार खुर्चीत, निवांतपणे पहूडल्यात,
तलवारी गंजून,
इतस्ततः विखरल्या गेल्यात,
अन छोट्या छोट्या पुंजक्याचा,
क्षीण आवाज, कुणाच्याच कानापर्यंत जात नाहीय.!
परंतु वस्तुस्थिती अशी आहे की,
यावतचंद्र दिवाकरो या देशात सत्तेची खुर्ची शाबूत
ठेवण्यासाठीआंबेडकर नावाचा जयजयकार अनिवार्य आहे,
मतांसाठी जिवाच्या आकांताने
जयघोष गरजेचा आहे,
अनिच्छेने का होईना, नतमस्तक होणे, अपरिहार्य आहे.!
अरे महाभागांनो,
तुमचे ठेवता झाकून आणि आमचे पाहता वाकून
सध्यस्थितीत कोणती चळवळ जिवंत दिसते?
पक्षीय चळवळ भंग पावली,
सामाजिक चळवळ नामशेष झाली,
कामगार चळवळ उध्वस्त केली,
अन राजकारणाची मंडई झाली,
एवढ्याने समाधान झाले नाही म्हणुन,
ह्या नतद्रष्टांनी महापुरुषांची देखील, जातीनिहाय वाटणी केली .!
आणि काय हो.!
आंबेडकरी गटबाजीची टिंगल का करता?
शिवसेना दुभंगली,
द्र. मु. क. ची शकले झाली,
कम्युनिष्ट पक्षाचे तुकडे झाले,
काँग्रेस तर अनेक गटात विखुरली,
समाजवादी अखेरचा श्वास घेताहेत,
अंतर्गत लाथाळ्यानी, भाजपा नेते
हैराण झालेत,
हे सर्व बघून तुम्हाला,
हसू का नाही येत?
पण कायम एक गोष्ट आहे सत्य,
गटबाजीला खतपाणी,
तुम्हीच घातले नित्य,
झालीच एकीची वज्रमूठ पक्की,
द्यावा लागेल सत्तेचा,
मोठा वाटा नक्की.!
पण आहोत आम्ही आशावादी,
सांगून गेलेत तथागत,
जग परिवर्तनीय आहे
घडेल असेच परिवर्तन कधीतरी,
होईल वज्रमूठ एकीची,
खेचून घेऊ, खुर्ची सत्तेची.!
खेचून घेऊ, खुर्ची सत्तेची.!!
खेचून घेऊ, खुर्ची सत्तेची.!!!



**अरुण निकम,**
**९३२३२४९४८७,**
**मुंबई,**

# केजच्या जनसेविका आ.नमितताताई मुंदडा यांचा वाढदिवस 'सेवा दिन' म्हणून साजरा!

## जल्लोषाऐवजी समाजसेवेला प्राधान्य; उपजिल्हा रुग्णालयात फळवाटप तर नवजात मुलींच्या नावे मुदत ठेवी (FD)

दैनिक वादळ वार्ता
**प्रकाश मुंडे । केज**

केज विधानसभा मतदारसंघाच्या लोकप्रिय आणि कर्तव्यदक्ष आमदार नमिताताई अक्षय मुंदडा यांचा वाढदिवस आज, ४ मार्च २०२६ रोजी मोठ्या उत्साहात आणि विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला. राजकीय शक्तीप्रदर्शनापेक्षा समाजसेवेचा वसा जपत मतदारसंघातील कार्यकर्त्यांनी हा दिवस 'सेवा दिन' म्हणून साजरा केला.लेक लाडकी: नवजात मुलींच्या भविष्यासाठी कौतुकास्पद पाऊल

आज बुधवार, दि. ४ मार्च रोजी उपजिल्हा रुग्णालयात जन्मलेल्या प्रत्येक कन्यारत्नाचे स्वागत अत्यंत आगळ्यावेगळ्या पद्धतीने करण्यात आले. आ. नमिताताईंच्या वाढदिवसाचे औचित्य साधून या नवजात मुलींच्या नावे मुदत ठेव (ऋऊ) करण्यात



आली. मुलींच्या उज्ज्वल भविष्यासाठी उचललेल्या या पावलाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

रुग्णसेवा आणि अन्नदान

दिवसभराच्या उपक्रमांमध्ये उपजिल्हा रुग्णालयातील रुग्णांना फळ वाटप करण्यात आले. तसेच, वृद्धाश्रमातील ज्येष्ठांसोबत वेळ घालवून त्यांना अन्नदान करण्यात आले व त्यांच्या दैनंदिन गरजेच्या वस्तू भेट म्हणून देण्यात आल्या. आपल्या लोकप्रतिनिधीचा वाढदिवस सामान्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलवून साजरा करण्याच्या या पद्धतीमुळे केजमध्ये सकारात्मक वातावरण पाहायला मिळाले.

मान्यवरांची उपस्थिती

या सर्व उपक्रमावेळी मतदारसंघातील सर्व प्रमुख पदाधिकारी, शासकीय अधिकारी, मान्यवर नागरिक आणि मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते. ताईंचे कार्य हेच आमची प्रेरणा आहे, अशा भावना कार्यकर्त्यांनी यावेळी व्यक्त केल्या.

जनतेचे प्रेम आणि आशीर्वाद हीच माझी खरी ताकद आहे. वाढदिवसानिमित्त राबवलेले हे सामाजिक उपक्रम मनाला समाधान देणारे आहेत.- आ. नमिताताई मुंदडा

भारतीय जनता पार्टी केजच्या वतीने आयोजित कार्यक्रमास शरद भैया इंगळे ,डॉक्टर वासुदेव नेहरकर, भगवानराव केदार, लालासाहेब शिंदे , महादेव अण्णा सूर्यवंशी, राहुल भैय्या गदळे,शिवाजी पाटील,सुरेश नांदे सर ,सुनील घोळवे ,प्रकाश मुंडे ,संतोष जाधव, डॉक्टर धनराज पवार, विक्रम डोईफोडे, सोनू सावंत ,विकास जाधव, खदीर भाई कुरेशी, शिवाजी जाधव, अनिरुद्ध शिंदे , श्रीराम कुटे, श्रीकिशन नागरगोजे,डॉक्टर ,नर्स, तसेच अनेक मान्यवर उपस्थित होते.

# भक्तीच्या महाकुंभात पात्रुडनगरी न्हाली

## ह.भ.प.भगवान बाबा महाराज पात्रुडकर यांची नर्मदा परिक्रमा पूर्ण

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

'नर्मदे हर'च्या जयघोषात, टाळ-मृदंगाच्या गजरात आणि अबालवृद्धांच्या उपस्थितीत पात्रुड गावचे सुपुत्र श्री ह.भ.प. भगवान बाबा महाराज पात्रुडकर यांचे नर्मदा परिक्रमा पूर्ण करून स्वगावी जंगी आगमन झाले. अत्यंत कठीण मानली जाणारी सुमारे साडेतीन हजार किलोमीटरची पायी परिक्रमा यशस्वीरीत्या पूर्ण करून परतलेल्या महाराजांच्या स्वागतासाठी संपूर्ण पात्रुड परिसरात भक्तीचा पूर लोटला होता.तपस्येची सांगता आणि ग्रामस्थांचा उत्साह

नर्मदा परिक्रमा ही आध्यात्मिक क्षेत्रातील एक मोठी तपस्या मानली जाते. मैयाला उजव्या हाताला ठेवून, अनवाणी पायांनी आणि अत्यंत साध्या राहणीमानाने हा प्रवास करावा लागतो. भगवान बाबा महाराजांनी ही वारी निष्ठेने पूर्ण केली. महाराज गावात येणार ही वार्ता समजताच पात्रुड ग्रामस्थांनी संपूर्ण गावाची स्वच्छता करून रस्ते रांगोळ्यांनी सजवले होते. गावाच्या वेशीवर महाराजांचे आगमन



होताच सुवासिनींनी मंगल कलश घेऊन त्यांचे औक्षण केले आणि पुष्पवृष्टी केली.गावातील मुख्य मार्गावरून महाराजांची भव्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी वारकरी संप्रदायातील भागवत भुजबळ व भजनी मंडळांनी विठ्ठल नामाचा आणि नर्मदा मैयाचा जयघोष करत वातावरण भक्तिमय करून सोडले. ठिकठिकाणी भाविकांनी महाराजांचे पाय धुवून दर्शन घेतले. आमच्या गावच्या सुपुत्राने एवढे मोठे पुण्यकर्म आणि खडतर प्रवास पूर्ण केला, याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे, अशा भावना ग्रामस्थांनी व्यक्त केल्या.

मिरवणुकीनंतर आयोजित सत्संग सोहळ्यात महाराजांनी आपले अनुभव कथन केले. ते भावूक होऊन म्हणाले,

नर्मदा परिक्रमा हा केवळ शारीरिक प्रवास नसून तो आत्मिक शुद्धीचा मार्ग आहे. साडेतीन हजार किलोमीटरचा हा प्रवास मैयाची कृपा आणि आपल्या सर्वांच्या आशीर्वादानेच निर्विघ्नपणे पार पडला. निसर्ग आणि मानवी मूल्यांची जपणूक हाच खरा धर्म आहे.

याप्रसंगी पात्रुड गावचे सरपंच पती लतीफ मोमीन, उपसरपंच घनश्याम भुतडा, माजी सरपंच एकनाथ मस्के, बाळासाहेब बनकर, शिवाजी गोमचाळे, महारुद्र जंगले, महावितरण कंपनीचे कर्मचारी पांडुरंग जामकर , नामदेव पोपळघट, गावातील सर्व मान्यवर व नागरिक महिलावर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थिती होते आणि या स्वागत सोहळ्याला परिसरातील अनेक नामवंत कीर्तनकार, प्रवचनकार, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवर पंचक्रोशीतील बाबाला मानणारा सर्व महिला पुरुषवर्ग मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. महाराजांच्या स्वागतानिमित्त पात्रुडमध्ये महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यामुळे गावात दिवाळीसारखा सण साजरा होत असल्याचे चित्र पाहायला मिळाले.

# एसटीच्या 'एनसीएमसी' कार्ड सक्तीला दिव्यांगांचा कडाकड विरोध; तळोदा तहसीलदारांना निवेदन सादर

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी) प्रवाशांसाठी लागू केलेल्या 'नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड' सक्तीमुळे दिव्यांग बांधवांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. या कार्डाची अट दिव्यांगांसाठी जाचक असून, त्यांना या प्रक्रियेतून कायमस्वरूपी वगळण्यात यावे, या मागणीसाठी भाजप दिव्यांग विकास आघाडीच्या वतीने तहसीलदार दीपक धीवरे यांना नुकतेच निवेदन देण्यात आले. एसटी महामंडळाने डिजिटल पेमेंटला प्रोत्साहन देण्यासाठी नवीन स्मार्ट कार्ड काढणे अनिवार्य केले आहे. मात्र, दिव्यांग विकास आघाडीचे अध्यक्ष मंगलचंद जैन यांनी या निर्णयावर कडाडून टीका केली आहे. त्यांच्या मते: आर्थिक भार: नवीन कार्डसाठी १९९ रुपये मोजावे लागणार




आहेत. हातावर पोट असलेल्या गरीब दिव्यांग बांधवांना हा खर्च परवडणारा नाही. केंद्र सरकारने आधीच दिव्यांगांना 'युडीआयडी' कार्ड दिले आहे, ज्यावर प्रवासाची सवलत मिळते. मग पुन्हा नवीन कार्डाचा घाट कशासाठी? असा सवाल उपस्थित केला जात आहे. ही नवीन सक्ती म्हणजे 'अपंग हक्क कायदा २०१६' चे सरळ उल्लंघन असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.ग्रामीण भागातील अनेक दिव्यांग बांधवांना डिजिटल कार्ड काढण्यासाठी शहरात येणे आणि तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करणे कठीण जात आहे. वारंवार नवनवीन कागदपत्रांची पूर्तता करणे दिव्यांगांसाठी त्रासदायक आहे. कार्ड नसल्यास भविष्यात सवलत नाकारली जाण्याची भीती आहे, अशी भीती मंगलचंद जैन यांनी यावेळी व्यक्त केली. निवेदन स्वीकारल्यानंतर तहसीलदार दीपक धीवरे यांनी या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन दिव्यांगांच्या या मागण्या आणि भावना तातडीने वरिष्ठ स्तरावर व संबंधित विभागाकडे कळवण्याचे आश्वासन दिले आहे यावेळी निवेदन देते वेळी राजेंद्र कलाल (उपाध्यक्ष, भाजप दिव्यांग विकास आघाडी),सुनील भाई (शहर प्रमुख) संजय शिंदे (तालुका सरचिटणीस),नीलेश माळी (शहर सचिव) इत्यादी दिव्यांग बांधव तसेच पदाधिकारी उपस्थित होते. आता या विषयावर राज्य शासन आणि एसटी महामंडळ काय भूमिका घेते, याकडे संपूर्ण राज्यातील दिव्यांग बांधवांचे लक्ष लागले आहे.

# ज्येष्ठ नागरिकांची रंगपंचमी साजरी



दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

विक्रोळीत कन्नमवार नगरातील ज्येष्ठ नागरिक प्रभात मित्र मंडळाच्या हरि ओम कट्ट्यावर प्रभात समयी ज्येष्ठ नागरिकांनी रंगपंचमी उत्सव रंगांची उधळण करून उत्साहात साजरा केला.ज्येष्ठ नागरिकांनी एकमेकांना रंग लावून आपला आनंद द्विगुणित केला.गाण्यांवर ताल धरुन ज्येष्ठ नागरिक बेफामपणे नाचले.या प्रसंगी मंडळाचे अध्यक्ष विवेक गायकवाड, सचिव ज्येष्ठ पत्रकार नासिकेत पानसरे,उपाध्यक्ष निवृत्ती मस्के,खजिनदार गौतम नि.डांगळे,माजी अध्यक्ष व विद्यमान कार्यकारिणी सदस्य सुरेश सरनोबत, माजी अध्यक्ष व ज्येष्ठ वृत्तपत्रलेखक कृष्णा काजरोळकर आदींसह मंडळाचे ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

# गुणवंत कामगार डॉ.प्रभाकर कांबळे यांना मी मराठी राज्यभाषा स्वाभिमान गौरव पुरस्काराने सन्मानीत

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

मैत्री संस्था व उत्प्रेरक फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी राजभाषा गौरव दिनानिमित्त मी मराठी लोक चळवळ अभियान अंतर्गत मी मराठी निमंत्रिताचे कवी संमेलन व मी मराठी राजभाषा स्वाभिमान गौरव पुरस्कार वितरण कार्यक्रमात वनिता फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष गुणवंत कामगार डॉ.प्रभाकर तुकाराम कांबळे , महानंदाचे कर्मचारी व गुणवंत कामगार केरबा हरिबा डावरे, भांडुप चे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व गुणवंत कामगार बाळकृष्ण तावडे ,संजय तावडे, महेंद्र ब्रीद लालबागचे गुणवंत कामगार प्रसन्न परकर, सम्यक चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष डॉ.राजेंद्र जाधव, अष्टपैलू कलाकार राजेंद्र सावंत , मंगलदीप पतपेढीचे अध्यक्ष राजू सोनकांबळे व सिडकोतील अधिकारी




वैशालीताई कांबळे आदींनी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल मी मराठी राज्यभाषा स्वाभिमान गौरव पुरस्कार प्रसिद्ध अभिनेत्री चिन्मयी सुमित, शिवाजीराव देशमुख फाउंडेशनच्या संस्थापक अध्यक्ष चारुशीला देशमुख, संभाजीराव राजे जाधवराव , सेन्सार फिल्म बोर्डाचे विलास खानोलकर ,आशादीप महिला मंडळाच्या अध्यक्षा आशाताई भोईर आदी मान्यवर च्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मैत्री संस्थेचे अध्यक्ष व कार्यक्रमाचे सर्वेसर्वा सुरज भोईर होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला निमंत्रितांचे कवी संमेलन तसेच महाराष्ट्राचे लोकशाहीर दत्तात्रय म्हात्रे व सहकारी यांचा सदाबहार मराठी स्मृती गीतांचा कार्यक्रम संपन्न झाला तसेच मानखुर्द येथील अंगणवाडी सेविकानी गाण्याच्या तालावर नृत्य सादर केले असून कार्यक्रमाला प्रमुख उपस्थित मध्ये पोलीस मित्र दिलीप नारद , आदर्श शिक्षिका स्पुहा सुरेश इंदू ,डॉ. संदीप नेवळेकर, ज्येष्ठ कवी मोहन जाधव, प्रियांका भोईर कांबळे डॉ. संतोष कांबळे आदी मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये गिरणगावातील करीरोड भागातील महाराष्ट्र हायस्कूल मैदान जवळील मनपा मजदूर कार्यालयाच्या बाळ दंडवते सभागृहात संपन्न झाला असून यावेळी प्रमुख मान्यवरांनी व निमंत्रित कवीनी मराठी भाषा वाचविण्यासाठी काय करावे याविषयी आपले विचार मांडले कार्यक्रमाला बहुसंख्येने विविध क्षेत्रात विशेष उल्लेखनीय कार्य करणारे सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. शेवटी डॉ. संतोष कांबळे यांनी सर्वांचे आभार मानलॅ.

# राजवाडी होळीत भाविकांचा उत्साह सातपुड्याच्या कुशीत रंगला ऐतिहासिक उत्सव

**दैनिक वादळ वार्ता**
**मोलगी । रविंद्र वळवी**

सातपुड्याच्या पर्वत रांगेत चौथ्या पुडयात वसलेले काठी हे राजे संस्थानिकांचे गाव. हे गाव नंदुरबार ह्या जिल्ह्याच्या ठिकाणा पासुन सुमारे ८० किलोमीटर तर अक्कलकुवा या तालुक्याच्या ठिकाणा पासुन ३५ किलोमीटर अंतरावर आहे. सुमारे ८०० वर्षा पासुन सुरु असलेली येथील राजवाडी होळी केवळ देशात प्रसिद्ध नसून तीने आपला ठसा साता समुद्रा पार उमटवला आहे. त्यामुळे होळीच्या निमित्ताने दि. २ मार्च रोजी संध्याकाळ पासुन या गावात मोठा उत्साह संचारला होता. ही ऐतिहासिक होळी साजरी करण्यासाठी संध्याकाळ पासुनच महाराष्ट्र, गुजरात, मध्यप्रदेश या राज्यातून पर्यटक व आदिवासी बांधवांचे जथ्थेच्या जथ्थे काठी गावाकडे दाखल होत होते. सर्वत्र आकाश निरभ्र व उत्साह पुर्ण वातावरण होते. त्यामुळे पर्यटक व भाविकांमध्ये अपुर्व उत्साह व अलोट गर्दी पाहायला मिळाली. या होळी साठी येणारे मोरवी, बुध्या हे आपले पारंपारिक साज श्रुंगार करुन जथ्याने सवाद्य होळी चौकात जमत होते. व या ठिकाणी होळी साठी असलेला खड्डा हा हाताने खणत होते. या उत्सवासाठी सातपुड्याच्या कुशीत असलेल्या प्रत्येक गाव पाड्यावरील भाविक या ठिकाणी पारंपारिक साज श्रुंगार करुन सहभागी झाले होते. त्यामुळे रात्री ११ वाजे पर्यंत गावात पाय ठेवायला जागा नव्हती. संपुर्ण गावात तसेच मोलगी ते काठी रस्त्यावर सर्वत्र ढोल, पावी, आणि घुंगराचा आवाज घुमत होता. त्या संगीताच्या तालावर मोरवी, बुध्या ,बावा फेर धरुन नृत्य करीत होते.काठी येथील होळी ही अनादी काळापासून साजरी केली जाते. आदिवासी बांधवांचे कुलदैवत राजापांठा व गांडा ठाकुर यांनी एकत्र येत या उत्सवाला प्रारंभ केल्याचे सांगितले जाते. काठी संस्थानचे पहिले राजे, राजे उमेदसिंह यांनी सन १२४६ मध्ये या होलिकोत्सवाला राजवाडी म्हणुन साजरी केली तेव्हा पासुन काठी संस्थानचे वारसदार व ग्रामस्थ ही ऐतिहासिक परंपरा मोठ्या श्रद्धेने जोपासत आहेत.काठी येथील होळी साठी लागणारा सुमारे ५० ते ६० फूट लांबीचा बांबु हा गुजरात राज्यातील राजपिपलाच्या नामगिरच्या जंगलातून आणण्याची परंपरा आहे. यावर्षी देखील पारंपारिक पद्धतीने काही कुटुंबातील सदस्य हे होळीचा बांबू घेण्यासाठी ५ दिवसापुर्वीच गुजरात कडे रवाना झाले होते. त्यांनी आदिवासी देवी देव हातरा यांचे पुजन करुन धरती मातेला नैवद्य देऊन बांबु खांद्यावर घेऊन पायपीट करीत काठी येथे आणला. ज्या मार्गावरुन हा बांबु आणला गेला त्या मार्गावर ठिक



ठिकाणी भाविकांनी मोठ्या श्रद्धा भावाने बांबुचे पुजन केले. त्यानंतर रात्री उशिराने बांबू काठी गावात आणला त्या ठिकाणी राज घराण्याच्या वारसदारांनी विधीवत पुजन केले. त्यानंतर दि.३ रोजी पहाटेच्या सुमारास हा बांबु होळी चौकात आणण्यात आला. त्यानंतर त्याला हार, कंगण, डाळ्या, खोबरे आदींचे नैवद्य देऊन पारंपारिक पद्धतीने होळी मातेला प्रज्वलित करण्यात आले. यावेळी बाबा, बुध्या, मोरवी यांनी होळी माते समोर फेर धरत जल्लोष केला.काठी येथील होळीचा दांडा कोणत्या दिशेला पडतो या वरुन अनेक अंदाज काढले जातात. यंदा होळीचा दांडा हा पुर्व दिशेला पडल्याने होळी साठी आलेल्या आदिवासी बांधवांनी एकंच जल्लोष केला व मोठ्या उत्साहात आपल्या गावी परतला. यंदा देशासह राज्यातील पाऊसमान उत्तम राहील. पिकांचे उत्पादन ही जोरदार होईल, नैसर्गिक आपत्ती टळेल व रोगराई ही दुर होईल असे शुभ संकेत यातुन मिळाले असल्याचे भाविकांनी सांगितले.सन २०१९ साली होळीचा उंच दांडा उभा करतानाच तो तुटला. ही घटना अशुभ मानली गेली. आपल्या सकट सर्व जगावर संकट येईल, असे आदिवासीं बांधवांचे म्हणणे होते. त्यानुसार कोरोनाचे संकट आले. पाऊस अनियमित झाला, अतिवृष्टीचा सामना करावा लागला. यंदा मात्र होळीने शुभसंकेत दिल्याने आदिवासी बांधव आनंदात आपल्या पाड्यांकडे रवाना झाले.

**होळी उत्सवाला यांची उपस्थिती**

यावर्षी खास होळी साठी राज्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके, खासदार ऍड. गोवाल पाडवी,
आमदार आमश्या पाडवी, आमदार राजेश पाडवी, अप्पर जिल्हाधिकारी धनंजय गोगटे, आदिवासी विकास विभागाचे अप्पर आयुक्त दिनकर पावरा, तहसीलदार विनायक घुमरे, मोलगीचे अप्पर तहसीलदार नितीन पाटील, निवासी नायब तहसीलदार दिलीप गांगुर्डे, यांच्या सह आदिवासी इतिहास संशोधक व साहित्यिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चिमूर तालुक्यात काँग्रेस संघटन अधिक सक्षम आणि गतिमान करण्यासाठी आपण सर्वजण एकजुटीने काम करू–विधिमंडळ काँग्रेस पक्ष नेते आ.विजय वड्डेटीवार

**दैनिक वादळ वार्ता**
**चिमूर । प्रतिनिधी**

चिमूर तालुक्यात काँग्रेस कमिटीची महत्त्वपूर्ण आढावा बैठक आझाद बंगला येथे ५ वाजता पार पडली. ही संपूर्ण बैठक महाराष्ट्र राज्याचे विधीमंडळाचे काँग्रेच पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली .या बैठकीत तालुक्यातील पक्ष संघटनेची सद्यस्थिती, सुरू असलेले कामकाज, बूथस्तरावरील बांधणी आणि संघटन विस्तार यांचा सखोल आढावा घेण्यात आला.




यावेळी विजय भाऊ वडेट्टीवार यांनी पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधत आगामी राजकीय दिशा, पक्षाची भूमिका आणि संघटन बळकटीकरणाबाबत स्पष्ट मार्गदर्शन केले. प्रत्येक गावात सक्रिय संघटन, नव्या कार्यकर्त्यांचा सहभाग आणि जनतेच्या प्रश्नांवर ठाम भूमिका घेणे, यालाच येत्या काळातही आपल प्राधान्य असेल, हे अधोरेखित केले.
काँग्रेस पक्षाचा विचार आणि जनहिताची बांधिलकी अधिक प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी ठोस कृती आराखडा ठरवण्यात आला. संघटन मजबूत असेल तरच जनतेचा विश्वास अधिक दृढ होतो, या विश्वासाने पुढील वाटचाल करण्याचा निर्धार या बैठकीत व्यक्त करण्यात आला.
चिमूर तालुक्यात काँग्रेस संघटन अधिक सक्षम आणि गतिमान करण्यासाठी आपण सर्वजण एकजुटीने काम करू! असे विधिमंडळ पक्ष नेते आ.विजय वड्डेटीवार यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.
या बैठकीत प्रामुख्याने येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका या प्रमुख मुद्द्यांवर चर्चा झाली तसेच काँग्रेस पक्षातील पक्ष वाढीसाठी कार्यकर्ते व पदाधिकारी यांना मार्गदर्शन करण्यात आले.प्रसंगी चिमुर तालुका युवक काँग्रेसचे अध्यक्ष श्री नागेंद्रजी चट्टे यांच्या वाढदिवसाच्या निमित्य केक कापून साजरा करण्यात आला. या बैठकीस प्रामुख्याने उपस्थित श्री विजय भाऊ वडेट्टीवार गटनेता महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस, श्री धनराज भाऊ मुंगले प्रदेश संघटक महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभाग, श्री दिगंबर भाऊ गुडगुडे पाटील ज्येष्ठ नेते काँग्रेस, श्री राम राऊत सर सेवादल काँग्रेस, श्री किशोर भाऊ शिंगरे जेष्ठ नेते काँग्रेस, श्री विजय पाटील गावंडे तालुका अध्यक्ष काँग्रेस चीमूर, श्री प्रमोद भाऊ चौधरी तालुका अध्यक्ष काँग्रेस नागभीड, श्री रमाकांत भाऊ लोधे, तालुका अध्यक्ष सिंदेवाही काँग्रेस, श्री गजानन भाऊ बुटके सरचिटणीस जिल्हा काँग्रेस कमिटी, श्री माधव बापू बिरजे माजी तालुकाध्यक्ष चिमूर, श्री विनोद भाऊ बोरकर गिरगाव वाढवणा जिल्हा परिषद क्षेत्र, श्री जुनेद खान काँग्रेस नेते, श्री संजय भाऊ बोडे, श्री रोशन भाऊ डोक माजी उपसभापती पंचायत समिती चिमूर, श्री सचिन भाऊ गाडीवर नगरसेवक नगरपंचायत भिसी, श्री बाबुभाई खान , श्रीकांत भाऊ गेडाम अध्यक्ष एन एस यु आय, श्री संदीप भाऊ कावरे माजी अध्यक्ष विधानसभा युवक, तसेच चिमूर विधानसभा क्षेत्रातील सर्व प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने गण उपस्थित होते

# बोरोळ महसूल मंडळात छत्रपती शिवाजी महाराज राजस्व समाधान अभियान शिबिराचे आयोजन



**दैनिक वादळ वार्ता**
**देवणी । प्रतिनिधी**

अनिलदार तथा तालुका दंडाधिकारी महाराष्ट्र शासन महसूल विभागामार्फत दि. १८ फेब्रुवारी २०२६ रोजी निर्गमित शासन निर्णयान्वये राज्यातील नागरिकांच्या महसुली तक्रारी व प्रलंबित प्रकरणांचा तात्काळ निपटारा करण्याच्या उद्देशाने 'छत्रपती शिवाजी महाराज राजस्व समाधान अभियान' हा विशेष उपक्रम राबविण्यात येत आहे. चरज्ञशी इरपपशी चरज्ञशी उक्त अभियानांतर्गत देवणी तहसीलमधील बोरोळ महसूल मंडळाच्या हद्दीत दवनहिपारगा (ता. देवणी) येथे शनिवार, दि. ७ मार्च २०२६ रोजी विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. देवणी तहसील अंतर्गत बोरोळ व वलांडी अशी दोन महसूल मंडळे कार्यरत असून, या उपक्रमाद्वारे नागरिकांना एकाच छताखाली विविध शासकीय सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.
सदर शिबिरात महसूल विभागासह भूमी अभिलेख, पोलीस, ग्रामविकास, कृषी, आरोग्य आदी विविध विभागांचे अधिकारी उपस्थित राहून राज्य व केंद्र शासनाच्या कल्याणकारी योजनांबाबत मार्गदर्शन करतील तसेच अर्ज स्वीकृती व तत्काळ कार्यवाही करतील. जमिनीचे ७/१२ उतारे, फेरफार प्रकरणे, नाव नोंदणी, जात प्रमाणपत्र, रहिवासी दाखला, उत्पन्न दाखला इत्यादी सेवांसंदर्भात मार्गदर्शन व निपटारा करण्यात येणार आहे.
सदर शिबिरास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपल्या तक्रारी व अडचणी मांडाव्यात, असे आवाहन उपविभागीय अधिकारी, निलंगा श्री. शरद झाडके तसेच तहसीलदार श्री. सोमनाथ वाडकर यांनी केले आहे.

# मानव,वन्यजीव संघर्ष व वनवा टाळण्यासाठी पथनाट्या द्वारे जनजागृती;वडसा वन विभाग वडसाचा उपक्रम

**दैनिक वादळ वार्ता**
**आरमोरी। प्रतिनिधी**

जोगीसाखरा-वडसा वन विभाग, वडसा वनपरिक्षेत्र कार्यालय आरमोरी क्षेत्र सहाय्यक पळसगाव यांच्या अंतर्गत आरमोरी तालुक्यातील जोगीसाखरा येथे चौकात मानव व वन्यजीव संघर्ष व वनवा टाळण्यासाठी मनोरमा बहउद्देशीय विकास संस्था गडचिरोली पथनाट्याद्वारे जनजागृती करण्यात आली यात जंगलात वनवा लागू न देणे ही सामाजिक जबाबदारी आहे, आपला शेतीचा बांध जाळताना प्रथम आपल्या नजीकच्या वन अधिकायांना सांगा, वनात फिरायला जाताना अग्नीजन्य वस्तू घेवून जावू नये. जंगलात किंवा जंगलातून जाणाऱ्या रस्त्याने सिगारेट, बिडी ओडूनये.कोणत्याही कारणाने आग लावण्याचा प्रयत्न करू नये.जंगलात गवत किंवा झाडांची मुळे पाणी धरून ठेवतात. त्यामुळे विहीर, बोअरवेल यांना पाणी वाढते.गवतांमुळे डोंगराची माती वाहून जात नाही. त्यामुळे उन्हाची तिव्रता कमी होण्यास मदत होते.
पशु पक्षी यांना निवारा मिळाल्याने निसर्ग चक्र सुधारते.
रानात पाणी उपलब्ध झाल्याने सध्या चालू असलेल्या मानव वन्यप्राणी संघर्ष या सारख्या समस्यांना प्रतिबंध होईल. असे पथनाट्यातुन प्रबोधन करण्यात आले हे पटनाट्य पळसगाव उपवन क्षेत्र सहाय्यक देविदास बोरकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले
यावेळी सामाजिक कार्यकर्ते दिलीप घोडाम पत्रकार भिमराव मेत्राम हरीदास बावणे सोपानदेव गेडाम पळसगाव वनरक्षक नारायण शिऊरकर , जोगीसाखरा वनरक्षक नवनवीन सागोळकर , सावलखेडा वनरक्षक हेमंत लोनबले, मजेवाडा वनरक्षक रुपा सहारे , सालमारा वनरक्षक विरागना शेंडे या सह जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक व विद्यार्थी , गावकरी उपस्थित होते.

## नगरम येथे चिरूतल रामायण उत्सव उत्साहात संपन्न

# राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून कार्यक्रमाला आर्थिक मदत

**दैनिक वादळ वार्ता**
**सिरोंचा । प्रतिनिधी**

सिरोंचा तालुक्यातील नगरम येथे गावकऱ्यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या चिरूतल रामायण नाट्य प्रदर्शनाचा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. राम-सीता चरित्रावर आधारित हा पारंपरिक सांस्कृतिक कार्यक्रम पंतुलू बापू जुट्टू यांच्या मार्गदर्शनाखाली सादर करण्यात आला. गावातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा आनंद घेतला.या सांस्कृतिक उपक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने आर्थिक मदत देण्यात आली. आमदार धर्मराव बाबा आत्राम यांच्या नेतृत्वाखाली पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी कार्यक्रमास उपस्थित राहून कलाकारांचे कौतुक केले तसेच अशा पारंपरिक कला जपण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले.यावेळी सिरोंचा तालुका अध्यक्ष मधुकर कोल्लूरी, शहराध्यक्ष रवी सुलतान, नगरमच्या उपसरपंच सुजाता रमेश तोटा, माजी उपसरपंच राजबापू कांबागोनी, कार्यकर्ता मानेम रमेश,यांच्यासह स्थानिक कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.चिरूतल रामायणसारख्या लोककला परंपरेमुळे ग्रामीण भागातील सांस्कृतिक वारसा जतन होत असून अशा कार्यक्रमांमुळे सामाजिक ऐक्य अधिक दृढ होत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# नायगावात धुळवडीच्या रंगोत्सवाची दिमाखदार मैफल सुरेल रंगली

## डीवायएसपी पानेगावकर यांच्या गायनाने उधळला भक्तिरंग,अवघा झाला एक रंग

**दैनिक वादळ वार्ता**
**नायगाव । हनुमंत चंदनकर**

धुळवडीच्या मंगल पर्वावर संतवाणीचा गजर आणि रंगोत्सवाची उधळण करत नायगावातील माणिकनगर परिसरात धुळवड विशेष रंगारंग कार्यक्रम दिमाखात रंगला. संतश्रेष्ठ संत तुकाराम यांच्या अवघा रंग एक झाला, रंगी रंगला श्रीरंग या अभंगवाणीचा भावार्थ जपत या सांस्कृतिक उपक्रमाने १२ वर्षांची तपपूर्ती पूर्ण करून १३ व्या वर्षाच्या रंगाची उधळण करत रौप्यमहोत्सवी पर्वाकडे वाटचाल सुरू केली.
भक्ती, साहित्य, लोकसंस्कृती आणि हास्यरसाचा संगम घडवणारा हा कार्यक्रम मंगळवारी (दि. ३ मार्च) सकाळी ८ वाजता वैष्णव कुंज या, ज्येष्ठ पत्रकार बाळासाहेब पांडे यांच्या निवासस्थानापासून हालगीच्या तालावर नाचत सुरू झाला. माणिकनगर, शिवम नगर, सुंदर नगर, वेंकटेश नगर मार्गे ज्ञानेश्वर नगर येथे व्ही. सी. जाधव (मुस्तापूरकर) यांच्या



निवासस्थानी रंगा रंग मित्रमंडळी पोहचली.येथे मुख्य रंगा रंग कार्यक्रम घेण्यात आला.कार्यक्रमास विशेष अतिथी म्हणून बिलोली उपविभागीय पोलिस अधिकारी मा. श्री. श्याम पानेगावकर साहेब उपस्थित होते. शिवराज पाटील होटाळकर, उमाकांतराव देशपांडे, बाबुराव लंगडापुरे, कवी पंडित मामा बेरळीकर तसेच नांदेडचे प्रसिद्ध कथाकार पत्रकार राम तरटे यांची प्रमुख उपस्थिती या कार्यक्रमास लाभली. कार्यक्रमाची सुरुवात गाणरत्न शंकर बिरादार सर यांच्या तूच सुखकर्ता... या भक्तिगीताने झाली. साहित्यिक व कवी वीरभद्र मिरेवाड (नांदेड) यांनी हास्यफवाऱ्यांनी सजलेले सुरेख सूत्रसंचालन करून रंगत अधिकच वाढवली. काव्यरत्न वेंकट आनेराये, बालाजी पेटेकर, बालाजी कवळे, बजरंग गादेवार , भंडरवाड सर,यांसह नवोदित कवींनी विनोदाचे चुटकुले सांगत हास्याचे फवारे उडवत काव्यवाचन सादर केले. सप्तसुर साथी संगीतरत्न शंकर बिरादार, ज्ञानेश्वर बैस, बालाजी चौधरी, रमेश जाधव, पंढरी पांचाळ, विकास भुरे, माधव भेदेकर यांच्या गायनाला विश्वेश्वर जोशी यांच्या वादनाची सुरेल साथ लाभली आणि कार्यक्रमात रंगत आली. या वेळी माणिकनगर, गजानन नगर, सहयोग नगर, श्री नगर, बळवंत नगर, शिवम नगर, सुंदर नगर, वेंकटेश नगर, बेळगे नगर , ज्ञानेश्वर नगर,तसेच मॉर्निंग वॉक ग्रुप, पत्रकार बांधव व रंगारंग मित्रमंडळींचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. घरमालक व्ही. सी. जाधव यांनी मान्यवरांचा शाल, पुष्पगुच्छ व श्रीफळ देऊन सत्कार केला. कार्यक्रमाच्या शेवटी मा. ना. अजितदादा पवार व कुलगुरू जनार्दन वाघमारे यांच्या सह वर्षभरात दिवंगत झालेल्या मान्यवर व्यक्तींना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. आभार ज्येष्ठ पत्रकार बाळासाहेब पांडे यांनी मानले. महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली.

### कानडा राजा पंढरीचा...

**डीवायएसपी श्याम पानेगावकर यांच्या सुरेल गायनाने राम तरटे यांच्या कथा कथनानेरसिकांची मने जिंकली .धुळवड रंगोत्सवाचे यंदाचे प्रमुख आकर्षण ठरले ते बिलोली–नायगाव विभागाचे उपविभागीय पोलिस अधिकारी श्याम पानेगावकर यांचे गायन. त्यांनी सादर केलेले कानडा राजा पंढरीचा हे भक्तिगीत ऐकताच उपस्थितांनी टाळ्यांचा कडकडाट करत दाद दिली. कर्तव्याच्या धकाधकीतून वेळ काढून त्यांनी सादर केलेल्या या भक्तिरंगामुळे कार्यक्रमात वेगळेच चैतन्य संचारले.तसेच कथाकार राम तरटे यांनी धुळीच्या रंगाची व गावाकडचे ग्रामीण वर्णन असलेली बारा आण्याची बोंब ही कथा सादर करत श्रोत्यांना जाग्यावर खिळवून ठेवत खळखळून हसवले. भक्ती आणि हास्यरसाच्या या संगमामुळे धुळवडीचा रंगोत्सवाचे तेरावे पुष्प संस्मरणीय ठरले.**

# विडा येथे धुलीवंदनाच्या दिवशी जावयाची गर्दभ सवारी उत्साहात सत्तरी उलटलेले शिवाजीराव गालफाडे यांना मिळाला अनपेक्षित मान

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील विडा गावात प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी जावयाची गर्दभ सवारी ही आगळी वेगळी आणि हास्यविनोदाने नटलेली पारंपरिक प्रथा मंगळवार,दि.३ मार्च २०२६ रोजी मोठ्या जल्लोषात पार पडली. यंदाच्या सोहळ्याचे विशेष आकर्षण म्हणजे सत्तरी उलटलेले शिवाजीराव गालफाडे यांना अनपेक्षितपणे मानकरी म्हणून गौरविण्यात आले.
ग्रामीण संस्कृतीत जावयाला मानाचे स्थान देत त्याच्यावर प्रेमळ चेष्टा करण्याची ही परंपरा विडा गावात अनेक वर्षांपासून जपली जात आहे.साधारणपणे गावात आलेल्या जावयाची निवड करून त्याची सजवलेल्या गर्दभावरून मिरवणूक काढली जाते.मात्र यंदा घडलेल्या घडामोडींमुळे कार्यक्रमात वेगळाच रंग भरला.मिळालेल्या माहिती नुसार, सुरुवातीला धरून आणलेला जावई अचानकपणे निसटल्या मुळे गावकऱ्यांमध्ये थोडी धावपळ उडाली.त्यानंतर दुसरा जावई पकडून आणण्यात आल्याने कार्यक्रम पार पडेल,असे सर्वांना वाटत होते. मात्र याच दरम्यान गेली साठ वर्षे विडा गावात वास्तव्यास असलेले शिवाजीराव गालफाडे यांना गावकऱ्यांनी अचानकपणे मानकरी म्हणून निवडले.स्वतः शिवाजी गालफाडे यांनाही आपणच गर्दभ सवारीचे मानकरी ठरू, याची अजिबात कल्पना नव्हती.आपल्याला पकडतील आणि आपलीच गर्दभ सवारी काढतील असे त्यांना वाटले नव्हते,कारण दुसरा जावई आणल्या मुळे आपल्यावर वेळ येणार



नाही,अशी त्यांची समजूत होती.परंतु गावकऱ्यांनी हसतखेळत त्यांना सजवून गर्दभावर बसवले आणि ढोल- ताशांच्या गजरात मिरवणूक काढली. महिलांच्या उखाणे, पारंपरिक ओव्या,टाळ -मृदुंगाच्या नादात आणि तरुणांच्या जल्लोषात संपूर्ण गाव दुमदुमून गेले. लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वांनी या सोहळ्यात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.शिवाजीराव गालफाडे यांनीही हा मान आनंदाने स्वीकारत परंपरेचा सन्मान राखला. गावकऱ्यांच्या मते,अशा लोकपरंपरांमुळेच बीड जिल्ह्याची सांस्कृतिक ओळख अधिक उठून दिसते.नातेसंबंधातील स्नेह,आपुलकी आणि सामाजिक ऐक्य जपणारी ही प्रथा आजही तेवढ्याच उत्साहात साजरी होत असल्याचे चित्र विडा येथे पाहायला मिळाले.विडा ग्रामस्थांनी ही परंपरा पुढील पिढ्यांपर्यंत जतन करण्याचा निर्धार व्यक्त केला.अनपेक्षित वळणा मुळे रंगलेली यंदाची जावयाची गर्दभ सवारी ग्रामस्थांच्या स्मरणात दीर्घकाळ राहील,अशी प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.दरम्यान शिवाजीराव गालफाडे यांच्या चिरंजीव यांनी प्रतिनिधीशी बोलताना सांगितले की,एकीकडे थोडे दुःख वाटते परंतु गावाची प्रथा परंपरा चालू राहीली पाहिजे म्हणून सहमती दर्शवली आहे.

# राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त स्वामी विवेकानंद माध्यमिक विभाग शाळेमध्ये भव्यदिव्य विज्ञान प्रदर्शन उत्साहात संपन्न

## एकूण ४३ विद्यार्थ्यांनी याप्रसंगी विविध केले प्रयोग सादर

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

जीवन विकास शिक्षण मंडळ केज संचलित, स्वामी विवेकानंद विद्या मंदिरमाध्यमिक विभाग या शाळेमध्ये राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त भव्यदिव्य असे विज्ञान प्रदर्शन भरवण्यात आले. यामध्ये ५ वी ते ६ वी (लहान गट ) व ७ वी ते ८ वी (मोठा गट) या दोन गटामध्ये मिळून एकूण ४३ विध्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता.या कार्यक्रमाचे उद्घाटन जीवन विकास शिक्षण मंडळ केज या संस्थेचे सचिव जी.बी.गदळे, शाळेचे मा.मुख्याध्यापक व विज्ञान शिक्षक बी.पी. तिडके, ज्ञानसागरकोचिंग क्लाससेसचे संचालक प्रा.सिद्धेश्वर वायबसे शाळेच्या मु.अ.शिवनंदा मुळे यांनी केले.उद्घाटना नंतर या कार्यक्रमाचे परीक्षण शाळेतील




विज्ञान शिक्षिका श्रीमती. गुंड मॅडम,विटेकर मॅडम तसेच तट सर व मैंद सर यांनी केले.सर्व विध्यार्थ्यांनी अत्यंत उत्कृष्ट व विलोभनीय असे प्रयोग सादर केले. यामध्ये विध्यार्थ्यांनी लेझर तंत्रज्ञानाद्वारे पाण्यातील जिवाणू ओळखणे,भूअंतर्गत भूकंपाच्या हालचाली, स्वामी विवेकानंद स्मार्ट स्कूल,व इतर असे उल्लेखनीय प्रयोग सादर केले.राष्ट्रीय विज्ञान दिना निमित्त विज्ञान प्रदर्शनामध्ये लहान गटातून स्वरा राऊत हिने प्रथम पारितोषिक पटकावले.सोहम कापरे याने द्वितीय तर अनुज चाळक व विराज शिंदे यांनी तृतीय पारितोषिक मिळविले.तर मोठ्या गटातून अजय आदमाने व अथर्व नेहरकर यांनी प्रथम क्रमांक पटकावला. तर शौर्य बारगजे व वेदांत राऊत यांनी द्वितीय तर सुदर्शन शिंदे याने तृतीय पारितोषिक मिळविले. या कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन शाळेतील विज्ञान शिक्षक तट सर तसेच त्यांचे सहकारी यांनी केले.वरील सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे जीवन विकास शिक्षण मंडळ संस्थेचे अध्यक्ष अंकुशरावजी इंगळे, सचिव जी.बी.गदळे, सहसचिव उपेंद्र कोकीळ, कोषाध्यक्ष फजीलोद्दीन काजी,संचालक नारायण अण्णा अंधारे,शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा शैलाताई इंगळे, शाळेच्या मुख्याध्यापिका शिवनंदा मुळे तसेच शाळेतील सर्व शिक्षक वृंद यांनी अभिनंदन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रबोधकांत समुद्रे यांनी केले.या कार्यक्रमासाठी शाळेतील सर्व शिक्षक वृंद उपस्थित राहिले व कार्यक्रमाची शोभा वाढवली.

# जिवती तालुक्यातील समस्या एका आठवड्यात निकाली काढा अन्यथा विरुगिरी आंदोलन करू-सुदाम राठोड

दैनिक वादळ वार्ता
**जिवती । प्रतिनिधी**

जिवती तालुक्यातील जमिनीचे सातबारा, फेरफार वारसाण नोंदी तात्काळ सुरु करण्यात यावे, जातीचे दाखले सर्व जातींना देण्यात यावे व गृह चौकशी नुसार जात वैधता प्रमाणपत्र त्या त्या स्व जिल्ह्यात देण्यात यावे, जिवती येथील ग्रामीण रुग्णालयात सोनोग्राफी, एक्सरे मशीन व पी. एम. रूम व १०८ रुग्णवाहीका सुरु करावे, जिवती तालुक्यातील शेतकऱ्यांना जिवती तालुक्यातील सर्व बँकानी तात्काळ पीक कर्ज वाटप करण्यात यावे,जिवती नगर पंचायत येथील मंजूर असलेले ६६४ घरकुलांना बांधकाम करण्याची परवानगी देण्यात यावी,जिवती तालुक्यातील सर्व कंपनीचे मोबाईल टॉवर तात्काळ व्यवस्थित पणे सुरु करण्यात यावे, या संपूर्ण मागण्या सात दिवसात सोडवाव्यात अन्यथा जिवती तालुका भूमिहीन शेतकरी बचाव संघर्ष समिती चे सर्व समन्वयक विरुगिरी पद्धतीने मोबाईल टॉवर वर चढून सर्व समस्या सुटेपर्यंत आंदोलन करणार आहेत, या आंदोलनात काही



इजा, दुखापत व जीवित हानी झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी शासन व प्रशासनाची राहील. यापूर्वी समितीने बरेच आंदोलने केली आहेत व निवेदने दिलेले आहेत परंतु शासन व प्रशासनाने फक्त आश्वासने दिली आहेत त्यामुळे महोदयांनी सर्व विषय तात्काळ मार्गी लावून सर्व मागण्या तात्काळ सोडविण्यात यावे असे निवेदन जिल्हाधिकारी चंद्रपूर यांना जिवती तालुका भूमिहीन शेतकरी बचाव संघर्ष समितीतर्फे देण्यात आले.

# महाराज प्रतिष्ठान तसेच महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई,राष्ट्रीय,पुरोगामी, व सह्याद्री पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तालुकास्तरीय नृत्य स्पर्धेमध्ये स्वामी विवेकानंद शाळेला प्रथम व द्वितीय पारितोषिक

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

शिवजयंती निमित्त घेण्यात आलेल्या महाराज प्रतिष्ठान केज आयोजित शिव जन्मोत्सव २०२६ निमित्त तालुकास्तरीय नृत्य स्पर्धेमध्ये स्वामी विवेकानंद विद्यामंदिर मा.वि.केज शाळेने प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळवले बक्षीसाचे स्वरूप सन्मानचिन्ह व रोख रक्कम ११००० रुपये तसेच पत्रकार संघा मार्फत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई, राष्ट्रीय पत्रकार संघ केज, पुरोगामी पत्रकार संघ व सह्याद्री पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या शालेय तालुकास्तरीय नृत्यस्पर्धा - २०२६ मध्ये स्वामी विवेकानंद विद्यामंदिर मा.वि.केज शाळेने द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळवले बक्षिसाचे स्वरूप सन्मानचिन्ह व रोख रक्कम ३८०० रुपये या दोन्ही स्पर्धेत अनुक्रमे ४० व ३० शाळांनी सहभाग नोंदवला होता या दोन्ही स्पर्धेत शाळेतील सातवी अ वर्गाच्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्राची लोकपरंपरा शेतकरी




लोकगीत सादर केले या स्पर्धेत सहभागी विद्यार्थी अपूर्वा सोनवणे, संस्कृती गायकवाड, किशोरी मुळे,तेजस्विनी कापरे,सृष्टी अडसूळ, समृद्धी नेहरकर,स्नेहा सोनवणे,नंदिनी सपाटे, श्रेया धपाटे,क्रांती धपाटे, आरती तपसे,प्रांजली घोळवे,श्रुती सावंत,प्राची ढोबळे,आरती फरके, हिंदवी खराडे,श्रावणी लोंढे,समर्थ येळवे,महेश चवरे,प्रसाद ढोबळे या विद्यार्थ्यांचा सहभाग होता या विद्यार्थ्यांना वर्गशिक्षक तथा सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रबोधकांत समुद्रे सर यांनी मार्गदर्शन केले. सांस्कृतिक विभाग सहाय्यक कल्याण आदमाने,दादासाहेब गायकवाड,शिवाजी समुद्रे यांचे सहकार्य लाभले.वरील सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे जीवन विकास शिक्षण मंडळ संस्थेचे अध्यक्ष अंकुशरावजी इंगळे, सचिव जी.बी.गदळे, सहसचिव उपेंद्र कोकीळ, कोषाध्यक्ष फजीलोद्दीन काजी,संचालक नारायण अण्णा अंधारे,शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा शैलाताई इंगळे, शाळेच्या मुख्याध्यापिका शिवनंदा मुळे तसेच शाळेतील सर्व शिक्षक वृंद यांनी अभिनंदन केले आहे.

# केज येथे श्रीकृष्ण मंदिर भूमिपूजन व १०८ कुंडी महा विष्णु महायज्ञाचे आयोजन

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज शहरातील भगवान श्रीकृष्ण आश्रम,बीड रोड येथे श्रीकृष्ण मंदिराच्या भव्य भूमिपूजन सोहळ्या निमित्त १०८ कुंडी भव्य महाविष्णु याग,तसेच ह.भ.प.रामराव ढोक महाराज यांच्या ओजस्वी वाणीतून संगीत रामकथा व अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.हा धार्मिक कार्यक्रम बुधवार दि.११ मार्च २०२६ ते गुरुवार दि.१९ मार्च २०२६ या कालावधीत संपन्न होणार आहे. या महा विष्णु यज्ञ,राम कथा व किर्तन सोहळ्या साठी हिमाचल प्रदेश येथील महंत तपस्वी परमहंस श्री १००८ स्वामी चिन्मय पुरीजी महाराज यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.संगीत रामकथा प्रवक्ते श्री.ह.भ. प. रामराव महाराज ढोक करणार असून दररोज सकाळी ८ ते ११ वाजता महाविष्णु १०८ कुंडी यज्ञ दुपारी २ ते ५ संगीत तुलसी



रामायण कथा, सायंकाळी धार्मिक विधी, कीर्तन व हरि जागराचे आयोजन करण्यात आले आहे.कार्यक्रमात विविध संत-महात्म्यांची कीर्तन सेवा लाभणार असून भाविकांसाठी दररोज महाप्रसाद व अन्नदानाची व्यवस्था करण्यात आली आहे.परिसरातील सर्व भाविकांनी व धर्मप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या पुण्यलाभाचा लाभ घ्यावा,असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.या कार्यक्रमाचे आयोजन भागवत भुषण श्री.ह.भ.प.केशव महाराज शास्त्री व श्रीकृष्ण आश्रम परिवार यांच्या वतीने करण्यात आले असून अधिक माहितीसाठी भाविकांनी आयोजकांशी संपर्क साधावा,असेही कळविण्यात आले आहे. दरम्यान यज्ञ मंडपाचे काम पुर्णत्वास आले असून राजस्थान येथील कारागीर मंडप उभारणी करण्यात मग्न आहेत. १०८ यज्ञ कुंड तयार करण्यात आले असून त्यांना गोमूत्र,गोमय, मृतीका यांनी सारवण करुन रंगरंगोटी करण्यात येत आहे.श्रीराम कथा मंडपाचे काम पुर्णत्वास आले असून भोजन मंडपाचे काम गतीने सुरू आहे अशी माहिती भगवान श्री कृष्ण आश्रम येथील आयोजक भागवत भुषण ह.भ.प. श्री. केशव महाराज शास्त्री यांनी प्रतिनिधीशी बोलताना सांगितले आहे.

# अल्पवयीन मुलीचे अपहरण व बाललैंगिक अत्याचार प्रकरणी आरोपीस नियमित जामीन मंजूर

दैनिक वादळ वार्ता
**माजलगांव । प्रतिनिधी**

माजलगांव शहरातील अल्पवयीन मुलीस आरोपी ओमकार दहिभाते याने अपहरण करून नेऊन अत्याचार केला या या प्रकारचा माजलगांव पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांनी आरोपी व पीडितेस आळंदी रोड तालुका खेड जिल्हा पुणे येथून ताब्यात घेतले, आरोपीस माननीय अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय माजलगांव यांच्या समक्ष हजर केले असता माननीय न्यायालयाने तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनवली होती. आरोपीने ॲड.अर्जुन शिंदे यांच्यामार्फत मा.न्यायालयात जामीन अर्ज दाखल करण्यात आला व ॲड.अर्जुन शिंदे यांनी मा. न्यायालयात योग्य ते युक्तिवाद करून मा. न्यायालयाने आरोपीचा जामीन योग्य त्या अटी व शर्तीवर मंजूर करण्यात



आला. याप्रकरणी ॲड.अर्जुन शिंदे यांना विशेष सहकार्य ॲड.वैभव सोळंके व ॲड. चेतन सातपुते यांनी केले.

# सातपुड्याच्या कुशीत घुमला ढोलाचा नाद! बोरदच्या ऐतिहासिक 'भोंगऱ्या' बाजाराची सांगता; लाखो भाविकांची मांदियाळी आणि लाखोंची उलाढाल

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

आदिवासी संस्कृतीचा मानबिंदू आणि सातपुड्याच्या दऱ्याखोऱ्यातील अस्मितेचे प्रतीक असलेला 'बोरदचा भोंगऱ्या बाजार' आज, २ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजेनंतर मोठ्या उत्साहात आणि विक्रमी गर्दीत संपन्न झाला. महाराष्ट्र, गुजरात आणि मध्य प्रदेश अशा तीन राज्यांच्या सीमेवर वसलेल्या बोरद गावाने दोन दिवस जणू एका 'सांस्कृतिक महाकुंभा'चे रूप धारण केले होते.या उत्सवाचे सर्वात मोठे आकर्षण म्हणजे दिनांक २ रोजी झालेले मुख्य होळी दहन. सायंकाळी गावातील मुखीयांच्या हस्ते होळी पेटवण्यात आली असून, त्यापूर्वी दिवस मावळेपर्यंत बाजार आपल्या पूर्ण वैभवात भरला होता. विशेष म्हणजे, आजही या भागात इतकी कडक श्रद्धा आहे की, जोपर्यंत होळी मातेचे दर्शन होत नाही, तोपर्यंत परिसरातील हजारो घरांमध्ये अन्नाचा कणही ग्रहण केला जात नाही. विज्ञानाच्या युगातही जपलेली ही निष्ठा संपूर्ण महाराष्ट्रासाठी



कौतुकाचा विषय ठरली आहे.
शहादा-तळोदा मतदारसंघाचे आमदार राजेश पाडवी यांनी या बाजाराला भेट देऊन उत्सवाचा आनंद द्विगुणित केला. केवळ लोकप्रतिनिधी म्हणून नव्हे, तर मातीचा पुत्र म्हणून त्यांनी बाजारात फेरफटका मारला. त्यांनी स्वतः हार-कंगन आणि पारंपरिक साहित्याची खरेदी करून स्थानिक आदिवासी कारागिरांना आणि छोट्या व्यापाऱ्यांना प्रोत्साहित केले. भोंगऱ्या बाजार ही आपली संस्कृती आहे आणि ती जपणे आपले कर्तव्य आहे, अशा शब्दांत त्यांनी भावना व्यक्त केल्या.यावेळच्या भोंगऱ्या बाजारात तृतीयपंथीयांचा सहभाग विशेष चर्चेचा ठरला. त्यांच्या मनमोहक नृत्याने आणि पारंपरिक वेशभूषेने उपस्थित जनसमुदायाला मंत्रमुग्ध केले. बाजार बघायला आलेल्या लाखो नागरिकांनी कुतूहलाने आणि आदराने त्यांचे सादरीकरण न्याहाळले, ज्यामुळे या उत्सवात एक वेगळीच रंगत आली.भोंगऱ्या बाजार हा केवळ मनोरंजनाचा उत्सव नसून तो या भागाचा आर्थिक कणा आहे. दोन दिवसांत या बाजाराने लाखोची उलाढाल घडवून आणली आहे. पानटपरीपासून ते कपडे, दागिने आणि गृहोपयोगी वस्तूंच्या दुकानांपर्यंत सर्वत्र 'हाऊसफुल्ल' गर्दी होती. स्थलांतरित तरुण आणि सासरी गेलेल्या लेकी-सुना या सणासाठी परतल्याने गावागावांत आनंदाचे उधाण आले आहे.लाखो लोकांच्या गर्दीचे व्यवस्थापन करण्यासाठी प्रशासनाने कंबर कसली होती ग्रामपंचायतीने ८ दिवस आधीपासूनच स्वच्छतेची विशेष मोहीम राबवली. रुग्णवाहिकेसह वैद्यकीय पथके २४ तास तैनात होती. पोलीस प्रशासनाकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता, ज्यामुळे इतकी मोठी गर्दी असूनही कोणताही अनुचित प्रकार घडला नाही.ढोलाच्या तालावर पडणारी पाऊलं आणि संस्कृतीच्या जतनासाठी एकवटलेला समाज, हेच बोरदच्या भोंगऱ्या बाजाराचे यश आहे. आज सायंकाळी बाजार विसर्जित झाला असला, तरी या उत्सवाच्या आठवणी आणि सातपुड्याच्या मातीचा सुगंध पुढच्या अनेक दिवसांपर्यंत संपूर्ण जिल्ह्याच्या मनात दरवळत राहील.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077